UNIVERSITY OF POONA
Jayakar Library

समाज-स्वास्थ्य

Vol. १५ Nos. १-१२
Pages १-३९८
Months जुलै-जून
Year १९४१-४२

Y1m2:N27
155F7.15
289551

POONA UNIVERSITY
JAYAKAR LIBRARY
RARE-BOOK
Kept Separately
Not to be issued out

वर्ष १५, अंक १ ला

# जुलै १९४१

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संपादकीय ... ... ... ... | १ |
| ४. | सुधारणेच्या मार्गांतील खांचखळगे-२ ... ... | २ |
| ३. | कार्य साधलें ! ... ... ... ... | ६ |
| ४. | दोर्षा मुलांचें बाह्यस्वरूप ... ... ... | १३ |
| ५. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... .... | १८ |
| ६. | पत्रव्यवहार ... ... ... ... ... | २४ |
| ७. | शारदेचें पत्र .... ... ... ... ... | २८ |


## वर्गणीची माहिती


हें मासिक दर महिन्याचे १५ तारखेस प्रसिद्ध होतें. कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येईल. वार्षिक वर्गणी ट. हां. सह दीड रुपया. हिंदुस्थानाबाहेरील ग्राहकांस रु. २ किंवा ३ शिलिंग. व्ही. पी. मागविल्यास चार आणे जास्त पडतील.

**पोर्तुगीज प्रांतांत व्ही. पी. पाठवणार नाहीं.**

वर्गणीबद्दल **पोस्टाचीं तिकिटें घेतलीं जाणार नाहींत.** पैसेच पाठवावे.

**पुणें येथील ग्राहकांनी** प्रो. दि. धों. कर्वे, ५९-१ लॉ कॉलेज रोड, यांजकडे वर्गणी भरल्यास चालेल. किरकोळ अंकही तेथें मिळतील.

अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हांस मिळाली पाहिजे,

**इतर ग्राहकांस पत्ता** :—राइट एजन्सी,

नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

मागील अंकास तीन आणे, तीन अंकास आठ आणे, नमुना फुकट. अमुकच महिन्याचा अंक नमुन्याकरता मिळणार नाही.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# संपादकीय

आमच्या अपेक्षेप्रमाणे **धनुर्धारीचे** संपादक श्री. प्रभाकर पाध्ये यांनी २२ जूनच्या अंकांत आम्हाला आणखी शिव्या देऊन घेतल्या आहेत. त्यांना उत्तर देत बसण्याचा आमचा विचार नाही, कारण त्यांना तर्कशास्त्र शिकवण्याचें काम आमचें नाही. याच लेखांत ते मामा वरेरकरांशीं आपली तुलना करतात, परंतु ती तुलना फोल आहे. **पूर्णिमा** व **धनुर्धारी** हीं दोन्ही साप्ताहिकें अेकाच मालकाने चालवलीं होतीं हें खरें, तेव्हा पाध्ये आणि वरेरकर हे अेकाच मालकाच्या हाताखालीं काम करीत होते, अितकें त्यांच्यांत साम्य आहे. परंतु पाध्यांना पगार मिळतो, आणि आमचे माहितीप्रमाणे वरेरकरांना तो मिळत नव्हता. तरी देखील पाध्यांचें साप्ताहिक चालू राहिलें आहे आणि वरेरकरांचें मालकाच्या हुकमाने बंद झालें आहे. पाध्यांच्या लिखाणाचा दर्जा किंवा त्यांचें संपादकीय कौशल्य वरेरकरांपेक्षां जास्त आहे असें आम्हास वाटत नाही. मग वरेरकरांना पगार द्यावा लागत नसूनहि त्यांचें पत्र बंद केलें आणि पाध्यांना पगार असूनहि त्यांचें चालू राहिलें तें कां? यांतलें अिंगित उघड आहे. मालकांच्या हुकुमाप्रमाणे वागून पाध्यांना त्यांची मर्जी संभाळतां येते, आणि वरेरकरांची प्रवृत्ति स्वतःला वाटेल तें लिहिण्याची असल्यामुळे त्यांना ती संभाळतां आली नाही, हेंच याचें कारण असलें पाहिजे. अर्थात् पाध्यांनी मालकाची मर्जी संभाळली तर त्याबद्दल आम्ही त्यांना दोष देत नाही. नोकरीची परवा असेल तर तें करणें भागच आहे. पण नोकरांचा स्वाभिमान

मुलांच्या अभ्यासाकडे शाळेंतच अधिक लक्ष पुरवतां येआील, आणि मुलांचाही फायदा होआील. याकरतां शाळेंतील शिक्षकांचा पगार वाढवून त्यांना खाजगी शिकवण्या करण्याची सक्त मनाआी केली पाहिजे. त्याकरतां मुलांची फीही थोडी वाढवावी लागली तरी चालेल. ज्यांना पुष्कळ मुलें आहेत त्यांना ही योजना अर्थात् परवडणार नाही, कारण शाळेचा खर्च फार होतो ही त्यांची आधींचीच ओरड आहे. अशा लोकांनी आपल्या मुलांपैकीं जीं मुलें बुद्धिमान असतील त्यांनाच शाळाकालेजांत पाठवावीं आणि अितरांना कांहीतरी व्यवसाय लावून द्यावा. नाहीतरी परीक्षेचा शिक्का मिळवूनही नोकरी मिळायची पंचाआीतच असते, तेव्हा शिक्षणाकरतां जे काय हजार पांचशें रुपये खर्च होणार असतील, त्यांचें अेखादें भाजीचें दुकान घालून दिलें, पिठाची गिरणी काढून दिली, टांगाघोडे घेऊन दिलें, किंवा भाड्याची मोटर घेऊन दिली, तर त्यांना अन्नानें स्वतःचें पोट तरी भरतां येआील, व तितकीच कर्तबगारी अंगांत असेल तर त्यांतही चार पैसे बाजूला ठेवून मोठ्या प्रमाणांत धंदा करतां येआील. शिवाय अर्धवट शिक्षणाने जी नसती मिजास वाढते व ज्या श्रीमंती संवयी लागतात, त्या तरी लागणार नाहीत. थोडेंबहुत शिक्षण मिळाल्यानंतर दुकानांत बसून भाजी विकण्याची, पीठ उघळलेल्या गिरणींत बसून लोकांचें दळण दळून द्यायची, भाड्याचा टांगा किंवा मोटर हांकण्याची लाज वाटूं लागते. स्वयंपाक करून ओले पंधरावीस रुपये मिळवण्यापेक्षा मास्तरकी करून कोरडे पंधरावीस रुपये मिळालेले बरे वाटतात. मग अर्थातच शिकवण्या मिळवण्याची धडपड, क्रमिक पुस्तकें लिहून तीं खपवण्याची खटपट, परीक्षांचीं प्रश्नोत्तरें छापण्याचा उपद्व्याप, अित्यादि भानगडी करीत बसावें लागतें.

शिक्षितांची अशी बेकार परिस्थिति असतांही नवीन शाळा व नवीन कालेजें उघडतच आहेत, जुनीं आहेत तीं आपला विस्तार वाढवीत आहेत, खेड्यांपाड्यांतूनही हें दीर्घशिक्षणाचें खूळ बोकाळेल की काय अशी भीति वाटत आहे. प्राथमिक शिक्षण नको असें मी म्हणत नाही, किंबहुना सर्वांना तें मिळालें पाहिजे असेंच मी म्हणेन. परंतु ज्या शिक्षणानें आज बेकारी आणि

माजोरेपणा तेवढा वाढला आहे, ज्ञानवृद्धि न होतां चवचालपणा तेवढा बोकाळला आहे, त्या शिक्षणाची चटक लोकांना लावण्यांत काय फायदा ? त्यापेक्षा धोबी, न्हावी, शिंपी, आचारी, मोटरवाला, टांगेवाला, यांच्या कामाचें शिक्षण देणाऱ्या शाळा काढल्या तर विद्यार्थ्यांना त्या त्या धंद्याची माहिती तरी नीट करून देतां येईल व त्यांना पोटाकरतां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची जरूर पडणार नाही. आज हीं कामें करणारी मंडळी समाजांत नाहीत असें नाही, परंतु त्यांचें काम किती अनियमित आणि असमाधानकारक असतें, हें लक्षांत आणल्यास वरील प्रकारच्या धंद्यांचें शास्त्रोक्त शिक्षण देणाऱ्या शाळा काढण्याची किती आवश्यकता आहे हें समजेल. फार काय, घरकाम करणाऱ्या नोकरांकरतां सुद्धां शाळा काढून सहासहा महिन्यांच्या मुदतीचा अभ्यासक्रम ठेवला तर तो हवा आहे. नवा नोकर ठेवायचा झाला की त्याला धुण्याझाडण्यापासून सर्व काम कसें अगदी नव्यानें शिकवावें लागतें, हें सर्व संसारी बायकांना माहीत आहे. विलायतेंत अेक नोकर बिनबोभाट किती काम करतो, आणि अिकडे दहा ठेवले तरी काम कसें उरकत नाही, हें पाहून वाअीट वाटतें. अितकी नालायकी असूनहि त्यांची मिजास किती ! गडी लुगड्यांना शिवणार नाही, ब्राह्मण उष्टीं काढणार नाही, आया मुलांचीं गुवेलीं धुणार नाही, अेक ना दोन. आतां मालकवर्गही सर्वस्वी निर्दोष आहे असें नाही. आपण त्यांना किती वाअीट रीतीनें वागवितों ? कांही बिनसलें की नोकरीवरून तडकाफडकी काढून टाकतों, ते आजारी पडले तर त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था तर करीत नाहीच, परंतु त्यांना लगेच रजा देऊन दुसरा नोकर ठेवतों. त्यांना कधी सुटी देत नाही, त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाही. मग त्यांनी कामांत कसूर केली, बाप आजारी असल्याचें, आअी मेल्याचें, खोटें कारण सांगून खाडा केला तर त्यांच्याकडे काय दोष आहे ? हल्ली दुकानांतील नोकरांना सुट्टी देण्यासंबंधी जसे नियम झाले आहेत, त्याप्रमाणे घरनोकरांसंबंधीही व्हायला पाहिजेत. नोकरीवरून त्यांना अेकदम काढून टाकायचें झाल्यास अेका महि-

न्याचा पगार त्यांना दिला पाहिजे, त्यांच्या औषधपाण्याकरतां दर महिन्याला मालकाने अेकदोन आणे त्यांच्या नांवाने अेक पेटी करून तींत टाकले पाहिजेत. अपरिहार्य कारणासाठी, किंवा लहानशा चुकीकरतां, किंवा आपली मिजास संभाळण्याकरतां जर त्यांना नोकरीवरून काढण्यांत येत असेल तर चांमल्या कामाचें व वर्तणुकीचें शिफारसपत्र त्यांना जातांना दिलें पाहिजे.

अशा तऱ्हेच्या सामान्य धंद्याचें शिक्षण देणाऱ्या शाळा निघाल्या, तर गिऱ्हाअिकांना धंदेवाअीक माणूस पुरवण्याचें कामहि या शाळांना करतां येअील व दोन्ही पक्षांची सोय होअील. उद्योगधंद्याचें शिक्षण वाढलें पाहिजे अशी आपण मागणी करतों. वर निर्देश केलेले व्यवसायही उद्योगधंद्यांतच मोडतात. आज शिंप्याचें शिक्षण देणाऱ्या अेकदोन संस्था आहेत असें समजतें. अशाच अितर लहानमोठ्या धंद्यांचें शिक्षण देणाऱ्या संस्था प्रस्थापित झाल्या पाहिजेत. नोकरीशिवाय हिंडणाऱ्या पदवीधरांची संख्या आणखी वाढायला नको आहे.

( अपूर्ण )

# कार्य साधलें !

:o:

‘ कुसुम, मी अैकतों हें खरें का ?’—‘ काय तें ?’

‘ तूं आपलें लग्न ठरवलें आहेस असें म्हणतात ?’—‘ कोण म्हणतात ?’

‘ तें तुला काय करायचें आहे ? खरें का खोटें तें सांग.’

‘ काय रिकामटेकडे लोक असतात ! नेहमी दुसऱ्याच्या उठाठेवी करायला हव्यात !’

‘ कुसुम, हें उत्तर नाही झालें. तूं खोटें बोलणार नाहीस असें धरून चालतों आहें मी. ’

‘ मग आतां सांगणें भागच आहे. हो, ठरवलें आहे. ’

‘ कोणाशीं ? ’—‘ आहे आमच्या कालेजांतला अेक विद्यार्थी. ’

‘ नांव काय त्याचें ? ’–‘ शिंदे. ’–‘ म्हणजे, मराठा ना ?’–‘असें वाटतें.’

# कार्य साधलें !

' वाटतें. म्हणजे खात्री नाही का ? '

' त्याचें असें आहे, कोणाला धडशी जात सांगतां आली नाही म्हणजे मराठा सांगतात. '

' म्हणजे त्याचा बाप कोण आहे ? '—' तें त्यालाच माहीत नाही. '

' पण त्याचा खर्च कोण चालवतें ? '

' येथल्या अेका सॉलिसिटरच्या मार्फत त्याला महिना शंभर रुपये मिळतात.'

' अस्सें ? मग आअी कोण हें विचारायलाच नको. '

' करायचें काय विचारून ? '

' बरें, तुझी त्याची ओळख कशी झाली ? '

' कालेजांत टेनिस टूर्नामेंटमधें आम्ही बरोबर खेळलों होतों. '

' अस्सें ! तो शिंदे होय ? '—' तुम्हीं पाहिला आहे का त्याला ? '

' करायचें काय पाहून ? तो काय आपल्या जातीचा आहे ? ना जात ना गोत, ना आअी ना बाप, आणि त्याच्याशीं तूं लग्न ठरवलेंस ? चांगला कारभार ! '

' ना जात ना गोत म्हणा हवें तर, पण आअीबाप नाही कसें म्हणतां ? तीं माहीत नसलीं तरी सगळ्यांनाच असतात, आणि जातीशीं करायचें आहे काय ? त्याच्यासारखा मुलगा सगळ्या कालेजांत मिळायचा नाहीं. '

' झालें ? देखणा मुलगा पाहिला की त्याची जात पहायला नको, आअी-बाप पहायला नको. '

' बाबा, तो नुसता देखणा नाही आहे हां. अभ्यासांत हुशार आहे, टेनिस उत्तम खेळतो, आणि तडफदार आहे. नांव काढल्याशिवाय राहणार नाहीं. '

' ज्याच्या नांवालाच धड पत्ता नाही तो नांव काय काढणार ? '

' म्हणूनच नांव काढील म्हटलें. जे आअीबापांच्या नांवावर विकतात त्यांचें काय मोठें कौतुक करायचें आहे ? जो स्वतः कांही करून दाखवील तोच खरा. '

'बरें तें कांहीं असो. या सगळ्या गोष्टी कांहीं लग्नाला उपयोगी नाहींत. मी कांहीं विशेष जुन्या मताचा नाहीं. मला अगदी कोंकणस्थच जांवई पाहिजे असें मी म्हणत नाहीं. देशस्थ किंवा कऱ्हाडा असला तरी चालेल. पण यापलीकडे जायला मात्र मी तयार नाहीं.'

'पण बाबा, लग्न माझें व्हायचें कीं तुमचें ?'

'आजपर्यंत मी तुला अितकी मोकळीक दिली हीच चूक झाली म्हणायची. हें लग्न कांहीं मी तुला करूं देणार नाहीं. हें ताबडतोब मोडायला पाहिजे, नाहीतर उद्यांपासून तुझं कालेज बंद. तुझ्यावर जुलूम करायची माझी अिच्छा नाहीं. मीं सांगितलेल्या जातींतला कोणीहि नवरा शोधून काढ, मी नको म्हणणार नाहीं. पण हा शिंदे नाहीं चालणार.'

'हा जुलूमच नाहीतर काय ?'

'तें तूं पाहिजे तें म्हण. पण हें लग्न मोडलें असें मला दोन दिवसांत कळलें नाहीं तर तुझें शिक्षण बंद. मग आपली लग्नाची तयारी कर. तुझ्या हातून तें होत नसलें तर मी करतों.'

'नको, मीच सांगेन.'

आजपर्यंत बापानें कधीं तिचें मन मोडलें नव्हतें. आअीबापांची ती लाडकी होती. पण या बाबतींत आअीकडूनहि आपल्याला पाठिंबा मिळणार नाहीं हें ती जाणून होती. तेव्हा तिनें आअीजवळही तक्रार केली नाहीं. कांहीं दिवसांनीं बापानें तिला फिरून छेडली.

'मग काय ? त्या शिंद्याला सांगितलेंस का ?'

'हो, कधींच सांगितलें.'

'पण तूं अजून त्याच्याबरोबर दिसतेस अशी मला बातमी लागली आहे.'

'मग काय, भांडण करायला पाहिजे ?'

'भांडणच नको, पण त्याच्याबरोबर हिंडलें म्हणजे संशयाला जागा राहते. न हिंडलीस तर बरें.'

# कार्य साधलें !

दुसऱ्या दिवशीं कालेजांत खेळून झाल्यावर ती एका विद्यार्थ्याला म्हणाली, ' अरे फाटक, चौपाटीवरुन चालत जाऊं या घरीं. येतोस ? '

' कां ? आज माझ्यावर कां अेवढी मेहेरबानी ? शिंदे नाही वाटतें ? '

' असें रे काय ? शिंदे आलाच नाही आहे, आणि माझें थोडें काम आहे तुझ्याशीं. येतोस का ? '

' हो हो. तूं बोलावल्यावर नाही कसें कोण म्हणेल ? आजच वाचलें नाही का ? ' लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियं, श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत् '

' अे, चेष्टा नको करूं हां. चल तर जाऊं या. ( रस्त्याला लागल्यावर ) काय रे, तूं लग्न करणार आहेस का अितक्यांत ? '

' म्हणजे, तुला करायचें आहे की काय ? '

' तूं अितका वेडा कसा रे ? अरे मला जर तुझ्याशीं लग्न करायचें असतें, तर मी का तुला विचारायला आलें असतें ? इतकें कसें कळत नाही तुला ? '

' मग कां विचारतेस ? '—' उत्तर दे म्हणजे मग सांगेन. '

' माझें शिक्षण पुरें होअीपर्यंत मी लग्न नाही करणार. मग ? '

' मग माझें एक काम आहे. कबूल करीत असलास तर सांगतें. '

' पण काय काम आहे तें कळल्याशिवाय कसें कबूल करूं ? '

' बरें पण कोणाला सांगणार नाही अेवढें तर कबूल कर. '

' तें करतों कबूल. '

' तुझें कोणाशीं लग्न ठरलेलें नाही आहे ना ?'—' नाही.'

' मग आपलें दोघांचें लग्न ठरलें आहे असें कांही दिवस सांगायला तुझा कांही हरकत आहे का ? हें नुसतें कांही दिवसपर्यंत सांगायचें आहे, लग्न करायचा प्रश्न नाही. आपलें शिक्षण संपलें म्हणजे आपण दोघेंही तें मोडलें म्हणून सांगूं. '

' पण हें कशाकरतां ? '

## कार्य साधलें !

अशा रीतीने दोन वर्षें गेलीं. या सर्वांचें शिक्षण संपलें. शिंद्याचा वशिला मोठा असल्यामुळे त्याला तावडतोब अिन्कम टॅक्स ऑफिसमधें नोकरी मिळाली. तरीहि त्याला आपला बाप कोण किंवा आओी कोण हें कळलें नाही.

कुसुम बी. अेस्सी. झाल्यावर, आतां थांबायचें कशाला, म्हणून तिचा बाप अेक दिवस म्हणाला, 'मग काय? आतां लग्न उरकून टाका अेकदां. थांबायचें कांही कारण नाही.'

'तें लग्न मोडलें, बाबा.'—'म्हणजे? कधीं? आणि काय म्हणून?'

'मींच मोडलें. मीं त्याला म्हटलें विडी सोडून दे. तो माझें अैकत नाही. मग मी कां लग्न करीन?'

'अग पण अेवढ्याशा कारणाकरतां कोणी लग्न का मोडीत असतें?'

'पण मला विडीची घाण येते. तुम्हाला काय?'

'अग पण मी नाही का विडी ओढीत? त्याची नाही तुला कोठें घाण येत ती?'

'पण मीं तुम्हाला कशी बंद करायला सांगू? आणि शिवाय तुमची गोष्ट निराळी.'

'पण तूं अितके दिवस त्याच्याबरोबर वावरते आहेस. अितके दिवस नाही तुला कोठें घाण आली?'

'अितक्या दिवसांची गोष्ट निराळी, पण......'

'मग आतां काय मुका घेऊन पाहिलास वाटतें? काय पोरी आहेत! आणि त्याचा बाप मला काय म्हणेल?'

'त्यांच्याकडून तक्रार येअील तेव्हा मी सांगेन काय सांगायचें तें. त्याची नको तुम्हाला काळजी?'

अिकडे त्याच्या घरींही हाच प्रकार झाला. तो म्हणाला, 'लग्न मीच मोडलें.' बाप म्हणाला, 'कां रे, काय झालें?'

'ती मला म्हणते, विडी सोडून दे.'

'अरे गाढवा! म्हणजे तूं विडी ओढतोस की काय?'

## कार्य साधलें !

अशा रीतीने दोन वर्षें गेलीं. या सर्वांचें शिक्षण संपलें. शिंद्याचा वशिला मोठा असल्यामुळे त्याला तावडतोब अिन्कम टॅक्स ऑफिसमधें नोकरी मिळाली. तरीहि त्याला आपला बाप कोण किंवा आओ कोण हें कळलें नाही.

कुसुम बी. अेस्सी. झाल्यावर, आतां थांबायचें कशाला, म्हणून तिचा बाप अेक दिवस म्हणाला, 'मग काय? आतां लग्न उरकून टाका अेकदां. थांबायचें कांही कारण नाही.'

'तें लग्न मोडलें, बाबा.'—'म्हणजे? कधीं? आणि काय म्हणून?'

'मींच मोडलें. मी त्याला म्हटलें विडी सोडून दे. तो माझें अैकत नाही. मग मी कां लग्न करीन?'

'अग पण अेवढ्याशा कारणाकरतां कोणी लग्न का मोडीत असतें?'

'पण मला विडीची घाण येते. तुम्हाला काय?'

'अग पण मी नाही का विडी ओढीत? त्याची नाही तुला कोठें घाण येत ती?'

'पण मी तुम्हाला कशी बंद करायला सांगू? आणि शिवाय तुमची गोष्ट निराळी.'

'पण तूं अितके दिवस त्याच्याबरोबर वावरते आहेस. अितके दिवस नाही तुला कोठें घाण आली?'

'अितक्या दिवसांची गोष्ट निराळी, पण......'

'मग आतां काय मुका घेऊन पाहिलास वाटतें? काय पोरी आहेत! आणि त्याचा बाप मला काय म्हणेल?'

'त्यांच्याकडून तक्रार येअील तेव्हा मी सांगेन काय सांगायचें तें. त्याची नको तुम्हाला काळजी?'

अिकडे त्याच्या घरींही हाच प्रकार झाला. तो म्हणाला, 'लग्न मोड-मोडलें.' बाप म्हणाला, 'कां रे, काय झालें?'

'ती मला म्हणते, विडी सोडून दे.'

'अरे गाढवा! म्हणजे तूं विडी ओढतोस की काय?'

' बाबा, कालेजांतलीं पुष्कळ मुलें ओढतात. आअीबापांसमोर ओढीत नाहीत अितकेंच. आणि तुम्ही नाही का ओढीत ! '

' बरें मग, पुढें काय झालें ? '

' व्हायचें आहे काय ? मीं तिला म्हटलें तूं ओढ हवी तर, मी नाही सोडणार. ती अैकत नाहीं, त्याला मी काय करूं ? मी तिच्याकरतां विडी सोडली म्हणजे माझा मान काय राहिला ? तेव्हा मोडलें लग्न. '

तेव्हा तक्रार कोणाचीच राहिली नाही.

अिकडे कुसुमचा बाप तिला म्हणाला, ' पण आतां तुझ्या लग्नाचें काय ? अशाने तुला नवरा कसा मिळणार ? '

' त्याची नको तुम्हाला काळजी, माझें लग्न ठरलेलें आहे. '

' अग तें मोडलें म्हणतेस ना ? '—' तें मोडलें, पण दुसरें ठरलें आहे.'

' कोणाशीं? '—' शिंदयाशीं. '

' अग पोरी ! म्हणजे आम्हाला फसवायला तुम्ही हें नाटक केलेंत मधल्या मधें आं ? तें कांही चालायचें नाही.'

' नाटक तुम्ही करायला लावलेंत, शिक्षण बंद करायची धमकी देऊन. आणि आतां मी शिंद्याशीं लग्न करायचें नक्की ठरवलें आहे. त्याला चांगली नोकरीहि मिळाली आहे. तुम्ही नाहीच म्हणालांत तर मला अेकवीस वर्षे पुरीं होअीपर्यंत थांबावें लागेल, नाहीतर ताबडतोब करतां येअील. आतां चारच महिने बाकी राहिले आहेत, तेव्हा तुम्ही ठरवा काय तें. '

मुलगी आतां अेवींतेवीं अैकत नाही असें पाहून बापाने रुकार देऊन आपला मान राखून घेतला अितकेंच नव्हे तर रजिस्ट्रारला घरीं बोलावून आणि मित्रमंडळीलाही आमंत्रण देऊन थाटाचा समारंभ केला. हुंड्याचा प्रश्नच नव्हता, तेव्हा पैशाच्या दृष्टीने त्यांचें कांहीच नुकसान झालें नाही. सनातनी मित्र लग्नाला आले नाहीत, तरी निदान दोनशें माणसें हजर होतीं, आणि लग्न मोडलें तरी फाटकही आला होता. त्याला आमंत्रणच तसें अगत्याचें होतें !

---

# दोषी मुलांचें बाह्यस्वरूप

लेखक. डॉ. के. भा. लेले, पुणें.

गेल्या वर्षी स्वास्थ्याच्या सप्टेंबर, आक्टोबर व नोव्हेंबरच्या अंकांत मुलांच्या मेंदूचे अनेक विकार सांगितले. आतां त्यांच्या बाह्यस्वरूपावरून कांही दोष सांगितले म्हणजे प्रस्तुतचा विषय संपला.

या सदरांत वेडीं व दुबळ्या मनाचीं मुलें येतात. अशा मुलांमध्यें विकार जितका बळावलेला असेल त्या मानानें त्यांचें बाह्यस्वरूप स्पष्ट किंवा अस्पष्ट असतें. येथे आपणाला अशा मुलांचें शरीर, त्याचे व्यापार आणि मानसिक स्थिति, याप्रमाणे तिन्ही बाजूंनी विचार करायचा आहे.

**१. शारीर दोष.** वास्तविक पाहतां मनुष्याचें शरीर प्रमाणबद्ध असावयास पाहिजे; परंतु त्यांत अनेक लहानमोठे दोष दृष्टीस पडतात. यासंबंधाने पूर्वीचे डॉक्टर फक्त शरीराला मानीत, परंतु आतां मन ही एक शक्ति असून तिचा अनेक प्रकारें शरीरावर परिणाम होतो असें तेच कबूल करूं लागले आहेत, आणि याहीपुढें जाऊन शरीरावर होणारे सर्व परिणाम केवळ मनाच्या क्रियेनें घडत असतात असें म्हणण्यापर्यंत त्यांची आतां मजल गेलेली आहे. आपण कांहीं उदाहरणें घेऊं.

**उदा० १.** कानाचा आकार व त्याची जागा यासंबंधाने आपणास अनेक दोष दृष्टीस पडतात. कांही मुलांचे कान डोक्याला चिकटलेले असतात, तर कांहींचे सुटे भागच नसतात. कांहीं मुलांचे कान फार मोठे असतात तर कांही जणांची उजवी व डावी बाजू सारखी नसते. कानांसंबंधी एक सामान्य सिद्धांत म्हणजे पुढे नीतिमान निपजणाऱ्या मुलाचे कान गुलाबाच्या फुलाप्रमाणे सुटया पाकळीचे व डोक्यापासून अलग असले पाहिजेत. तथापि कोणत्याहि कानाच्या लहानमोठ्या उंचवट्यावरून विशेष अर्थ व्यक्त होत नाही.

**उदा० २.** डोळे मिटल्यानंतर खालच्या व वरच्या पापण्यांमधील फट तिरपी असूं नये, अथवा पापण्या व नाक यांमध्यें सुरकुती दिसूं नये. अनेक

तपासून पाहतां जणूं त्यांची एक जातच आहे असें वाटतें. सतरा इंची डोकें व उतरतें कपाळ, हा एक लहान डोक्याचा नमुना आहे. याच्या उलट डोक्यावर पाणी सांचलें म्हणजे डोकें मोठें ( हायड्रोसेफॉलिक ) होतें. अर्थात् हें विकाराचें लक्षण आहे. वरील सर्व मुलें दुबळ्या मनाचीं असतात.

**२. शारीर व्यापारासंबंधीचे दोष.** ज्याप्रमाणे शरीर बांधेसूद असावें म्हणून पूर्वी सांगितलें, त्याचप्रमाणे शरीराच्या क्रियाहि प्रमाणबद्ध असाव्यात. तथापि त्यांतही अनेक दोष उद्भवतात व ते पालकांनी मुलांच्या लहानपणींच लक्षपूर्वक टिपून ठेवावेत. उदा० मुलाला दांत उशिरां येऊं लागले की काय ? मूल केव्हां चालूं लागलें ? या माहितीवरून मुलाला 'रिकेटस' चा विकार होता की काय तें समजेल. परंतु जेव्हा या विकाराबरोबर मूल बोलतहि नसेल, अथवा त्याला गुवामुताच्या घाणेरडेपणाची कल्पनाही नसेल, तेव्हा तो त्याच्या बुद्धीचा दोष समजावा. केव्हातरी डोक्याला मार लागल्यामुळे अथवा दुसऱ्याच एखाद्या विकारामुळे वरील चिन्हें दिसूं शकतील, परंतु तो बुद्धीचा दोष नसून शरीराला झालेल्या दुखापतीचा परिणाम समजावा.

वरीलप्रमाणे बारकाईने पाहूं गेल्यास अनेक दुबळ्या मनाचीं मुलें दृष्टीस पडतील. आतां हीं मुलें शाळेंत जाऊन काय शिकणार व त्या शिक्षणाचा त्यांना स्वतःला व देशाला काय फायदा होणार, हाहि विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. जन्मतःच वेडा असलेल्या मुलाला स्वच्छतेची कल्पना फार उशिरां येते. त्याचप्रमाणे वर सांगितलेल्या दुबळ्या मुलांना योग्य वयांत स्वच्छतेची कल्पना असत नाही. यामुळे अशा मुलांकडे पालकांनी अथवा शिक्षकांनी दुर्लक्ष केलें असतां त्यांना अस्वच्छ राहणीची संवय होते व तीच पुढें जन्मभर टिकते. कांही वेड्या मुलांना ८ व्या वर्षी सुद्धां स्वतः होऊन बसतां येत नाही, आणि ५ व्या अथवा ६ व्या वर्षापर्यंत सुद्धां कांहींना बोलतां येत नाही. अशीं मुलें जन्माला येणें म्हणजे त्यांचे स्वतःचे जन्मभर हाल, लहानपणीं पालकांना ओझें, व देशाच्या दृष्टीने नुसती खोगीरभरती, असेंच नव्हे काय ?

वास्तविक पाहतां हीं मुलें जन्मास यावयास नको होतीं, पण मुलें उत्पन्न करणें हें सोपें असून त्यांच्याविषयींची जबाबदारी ओळखणें हेंच या देशांतील प्रौढ लोकांना समजत नाही, यामुळे आपणास दुःख व दारिद्य भोगावें लागलें तर आश्चर्य नाही. वरील वर्णनावरून संततिनियमनाचें महत्त्व सहज पटण्यासारखें आहे. यावरून विवाहाचा काल व मर्यादा, संभोगसुख व संतति यांचें प्रमाण कोठे व कसें बसावें, हाहि महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो, परंतु त्याचा प्रस्तुत विषयाशीं संबंध नाही.

आपल्या मूळ विषयाकरतां कांही उदाहरणें घेऊं.

**उदा० १.** योग्य वेळीं मूल बोलूं लागलें तरी प्रत्येक अक्षराचा स्पष्ट उच्चार होतो की नाही हेंही पाहणें जरूर आहे. कारण असा दोष कांहीं मुलांमध्यें ८-१० वर्षेपर्यंत सुद्धां राहून जातो. परंतु या वयाच्या पुढें उच्चारलेल्या अक्षरांची अस्पष्टता म्हणजे तें मेंदूच्या दोषाचें लक्षण समजावें. यावरून मला अनेक माणसांच्या भाषणपद्धतीमधील घोडचुका दाखवायच्या आहेत. आपले विचार दुसऱ्याला समजावेत म्हणुन आपण बोलतों, हेंच पुष्कळांना माहीत नसतें असें दिसतें. कोणी ओठ न हालवतां बोलतात, तर कोणी अतिशय जलद बोलतात; कोणी मध्येंच अनेक शब्द खातात तर कोणी अतिशय हळू व सावकाश बोलतात; कोणाला कानांत बोलतां ( व्हिस्पर ) येत नाही, तर कोणाचें ओरडल्यावांचून भागत नाही; कोणी खांकरून बोलतात तर कोणाचें तोंड वांकडें होतें; कोणी बोलतांना मान हालवतात तर कोणी खांदे उडवतात; वास्तविक हे सर्व दोष आहेत, परंतु बोलणाराला स्वतःमधील दोष न समजल्यामुळ तो नेहमीच आपल्या पद्धतीने बोलतो, परंतु ऐकणाराला तशी संवय नसल्यामुळे एकतर बोलणाराचें भाषण समजत नाही; व दुसरें म्हणजे भाषण ऐकणें बाजूलाच राहून अशी भाषणपद्धति हाच एक थट्टेचा विषय होऊन ऐकणारांत वरचेवर हंशा पिकतो. व्याख्यात्यांनी इकडे लक्ष द्यावें.

कांही मुलांना ऐकलेला प्रश्न पुन: उच्चारल्याशिवाय उत्तर देतां येत नाही, आणि कांही जणांना स्वतःच उच्चारलेले शब्द पुनः एकदां अथवा

दोनदां उच्चारल्याशिवाय भागत नाही. उदा० किती वाजले ? उत्तरः—किती वाजले होय ? तीन वाजले, तीन, तीन.

अर्थात हें सर्व मेंदूचे अथवा मनाचे विकार समजावेत, आणि थोड्या-बहुत परिश्रमाने ते दुरुस्तहि होण्याजोगे आहेत.

**उदा० २.** कांही मुलांना ताठ उभेंच राहतां येत नाही, यामुळे त्यांचें उभें राहणें बावळ्यासारखें दिसतें. अशीं मुलें लठ्ठ अथवा मांसल दिसलीं तरी त्यांच्या स्नायूंना बांधेसूदपणा आलेला नसतो. यामुळे हीं मुलें उभीं राहिलीं म्हणजे त्यांचे गुडघे किंचित् वांकतात, तोंड उघडें राहतें व तोंडाबाहेर लाळहि गळते. असा प्रकार अनेक मोठ्या माणसांतहि दृष्टीस पडतो. अर्थात् हें मानसिक दुबळेपणाचें चिन्ह समजावें.

**उदा० ३.** कांही मुलांना स्वतःचे कपडे अंगावर चढवतां येत नाहीत अथवा अंगावरून काढतांही येत नाहीत. यामुळे लहानपणीं हीं कामें त्यांच्या पालकांना करावीं लागतात, परंतु मोठेपणीं अशा माणसांचे कपडे अंगावर व इतरत्र अस्ताव्यस्त राहिले तर आश्चर्य नव्हे. अर्थात् हें मानसिक दुबळेपणाचें चिन्ह समजावें.

**उदा० ४.** कांही मुलांमध्यें एकसारखी अस्वस्थता दिसून येते, यामुळे तीं एकसारखे हातपाय अथवा मान हालवीत राहतात. कोणी तोंडच हालवीत राहतात, यामुळे दुःखी दिसतात; कोणीं काळजींत असल्याचा भास होतो तर कोणी विनाकारण हंसल्यासारखे वाटतात; कोणी मत्सरी दिसतात तर कोणी रागावल्यासारखे वाटतात; वास्तविक असा कोणताही मनोविकार कारणावांचून मनुष्याच्या चेहऱ्यावर दिसूं नये. कोणी उगीचच खांदे उडवतात तर कोणी बोटें मोडीत राहतात, कोणी नखें खातात तर कोणी तोंडांत बोटच खुपसून बसतात. असे अनेक प्रकार आहेत.

माझ्या पाहण्यांत एक मुलगा आहे, तो केव्हाही ताठ उभा न राहतां शरीराची कमान करीत असतो, व उभेंच रहायचें झाल्यास भिंतीला हात देऊन

तो एका पायावर उभा राहतो. तो एकसारखे ओठ आंत ओढून घेतो, इतक्यांत त्याला आपला पवित्रा बदलणें भाग पडतें. हे सर्व प्रकार मानसिक दुबळेपणा दर्शवतात.

अशा मुलांमध्यें अनेक वेळां फेपऱ्याचा विकार दिसून येतो व फेपऱ्याचा झटका येऊन जातांच त्यांच्यामधील दोष अधिक स्पष्ट होतो. मेंदूचा कांही भाग बधिर असल्याचेंही कांही वेळां दृष्टीस पडतें. ( अपूर्ण )

---

# ग्रंथपरीक्षण

**१. विभूतिपूजा,** लेखक, नन्दू खोटे. प्रकाशक, एम्. के. सुखटणकर, शांताराम नारायण सापळे, समर्थ हाउस, चौबळ लेन, मुंबई–४. पृ. ६९, किंमत ८ आणे.

कालेजमधील तरुणतरुणींच्या व्यवहारांचें चित्र रंगवण्याचा प्रयत्न या नाटिकेंत केला आहे. तो विडंबनात्मक आहे म्हणावें तर विडंबनाचें जें मुख्य अंग विनोद, तो या नाटिकेंत मुळीच नाही. उमेटपणाला विनोदाच्या सदरांत घालतां येत नाही. सत्य चित्र रेखाटलें आहे म्हणावें तर सगळीकडेच फार अतिशयोक्ति आहे आणि कथानकांत वाटेल तसे अशक्यप्राय प्रसंग घुसडले आहेत. भाषेसंबंधी बोलायचें तर ती धेडगुजरी आहे. पण कालेजांतील मुलांना काय किंवा शिक्षकांना काय, शुद्ध मराठी बोलतां येतें कोठें ? **शकुंतला परांजपे.**

**२. साहित्य आणि साहित्यिक,** लेखक, ह. वि. देसाई; प्रकाशक शंकर वा. कुळकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई, नं. ४. पृ. १४४, किं. १–४–०.

वृत्तपत्रव्यवसायांत पडल्यामुळे वेळोवेळीं लिहाव्या लागलेल्या लेखांचा आणि परीक्षणांचा संग्रह करून हें पुस्तक निर्माण केलें आहे. वर्तमानपत्रांतील वाङ्मयाचें महत्त्व बहुधा तात्पुरतें असतें, तेव्हा असलें वाङ्मय संकलित करून

पुस्तकरूपाने छापणें वेडेपणाचें आहे. फडक्यांचा लेख, सावरकरांचें भाषण, केळकरांचें भाषण, यांचें महत्त्व आज कोणालाही वाटत नाहीं, मग त्या वेळीं त्यांवर झालेल्या टीकेला कोण विचारणार ? तसेंच वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांवर वृत्तपत्रांतून जीं परीक्षणें येतात, त्यांचीहि किंमत तेवढ्यापुरतीच असते. ग्रंथ वाचण्यासारखा असेल तर लोक तो वाचतात व आपापलें मत बनवतात. टाकाऊ असेल तर तो रद्दीवारी जातो आणि जनता त्याचें नांवही विसरते. कांही असलें तरी प्रकाशनानंतर वर्ष दोन वर्षांनी जुन्या परीक्षणांना मात्र कोणीहि विचारीत नाहीं.

काणेकरांची प्रस्तावना आणि उत्तरपक्ष म्हणून प्रस्तावना नं. २ च्या जागीं छापलेला वरेरकरांचा उपसंहार, यांनीहि पुस्तकांतील मजकुराला भाव येत नाहीं. प्रत्येक पानावर लेखकाने आपल्या वाचनाचें केलेलें प्रदर्शन फार कंटाळवाणें होतें. परीक्षकांना आपल्या अगाध वाचनाने चकित करून सोडण्याकरतां कालेजांतील विद्यार्थी कारण नसतांही मोठमोठ्या लेखकांचे पाठ केलेले उतारे देत असतात, परंतु विद्यार्थीदशा सोडल्यानंतर वाचलेलें पचवून आपलें मत बनवून ते आपल्या शब्दांत सांगण्याची पात्रता अंगीं नसेल, तर माणसाने लिहिण्याच्या भरीस पडूंच नये. क्वचित् काळीं अेखादा आधार दिला तर तो परिणामकारक होतो, परंतु पदोपदीं 'गोमाजी कापशे' असें म्हणतो आणि 'सोमाजी टापशे' असें लिहितो, ही किटकीट करण्यापेक्षा त्या अिसमांच्या पुस्तकांची क्रमवार यादीच दिलेली काय वाअीट ? **शकुंतला परांजपे.**

**३. जलधारा.** लेखक बाबुलनाथ; प्रकाशक, ल. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, १९८ । १७, सदाशिव पेठ, पुणें. पृ. ९२, किंमत १२ आणे.

कवितांचे विषय नीरस आहेत. त्यांच्यांत विविधपणा तर मुळीच नाहीं. राष्ट्रप्रेम आणि कामुक प्रेम या दोनच विषयांवर बऱ्याचशा कविता रचल्या आहेत. कविता रचण्याची पद्धतही रुक्ष आहे. केव्हा केव्हा उपहास थोडाबहुत साधला आहे. उदा० 'पहिली केस' (पृ. ९) आणि 'नागिणी'

( पृ. २८ ). राष्ट्रप्रेमावर आधारलेल्या ' हिंदुनों उठा अतां यापुढे ' ( पृ. १ ), ' अर्गळची राणी ' ( पृ. ३० ) ' कशाचें स्वातंत्र्याचें गीत ' ? ( पृ. ९० ), ह्या कविता चांगल्या आहेत. ' वांझ ' ही अेकच कविता उत्तमांत गणली जाअील.

**शकुंतला परांजपे.**

**४. मानवी जीवन आणि बुद्धिवाद.** लेखक व प्रकाशक, ना. स. बापट, पृ. ३९, किंमत ५ आणे.

अितर प्राण्यांहून मनुष्याचें वैशिष्ट्य त्याच्या ठायीं असलेल्या बुद्धींत आहे. ह्या बुद्धीच्या जोरावरच आजपर्यंत मनुष्याने आपली सुधारणा करून घेतली आहे, आणि तिच्याच सहायाने तो अधिकाधिक उन्नतावस्थेला पोहोंचेल. दैववाद, श्रद्धावाद, भावनावशता, अित्यादि अनेक शत्रु बुद्धिवादाच्या मार्गांत आहेत, त्यांना काबीज कां व कसें करावें, याचे अनेक दाखले देऊन लेखकाने बुद्धिवादाचें अतिशय निर्भीड विवेचन केलें आहे. ' जेथें असहिष्णुता आहे तेथें बुद्धिवाद नांदणें शक्य नाहीं ' असें लेखक पृ. १७ वर म्हणतात. पृ. ३९ वर मात्र साहित्यासंबंधी लिहितांना 'कलेकरतां कला' या तत्वाचा निषेध करून अशा लेखकांना त्यांनी प्रतिगामी म्हटलें आहे. ध्येयाकरितां किंवा प्रचाराकरतां लिहूं नये असें कोणीही म्हणत नाही, परंतु जर कोणाला केवळ करमणुकीकरतां अथवा कलेकरतांच लिहावेंसें वाटलें तर त्यांना बंदी कां ? हें लिखाण जर बुद्धिवादाच्या शिकवणीविरुद्ध नसेल तर तें प्रतिगामी कसें ठरतें ? चोवीस तास ध्येयासंबंधी कोण विचार करूं शकेल ? लेखकही स्वतः केवळ करमणुकी-करतां शास्त्रीय विषयाव्यतिरिक्त अेखादें पुस्तक कधी वाचीत नाहीत काय ? ध्येयविहीन लिखाणाला रद्द करणें झाल्यास मॉलिअेरचीं बहुतेक नाटकें व जेन ऑस्टेनच्या सर्व कादंबऱ्या केराच्या टोपलींत टाकाव्या लागतील.

' बुद्धिवाद वाढला तर भाषाशुद्धि वेडगळपणा ठरेल ' असेंहि अेक विधान पृ. ३५ वर केलें आहे. भाषाशुद्धि हें भाषेच्या सौंदर्याचें अेक अंग आहे. आतां हाच निबंध लेखकाने जर अशुद्ध अथवा वेडगुजरी भाषेंत लिहिला असता, तर तो वाचण्याची तसदीही मी घेतली नसती. परभाषेंतील नव्या कल्पना आत्म-

सात् करतांना परकी शब्दही भाषेला अंगीकारावे लागतात, परंतु ज्या परकी शब्दांना मूळ भाषेंत शब्द आहेत, ते परकी शब्द भाषेंतून हांकलून लावण्याने बुद्धिवादाचा भंग होतो असें मला वाटत नाही. बुद्धीचा तीक्ष्णपणा ह्या निबंध-वजा पुस्तकांत सर्वत्र आढळतो. विचारी माणसानें हें अवश्य वाचावें.

**शकुंतला परांजपे.**

५. **काळी राणी,** लेखक, पु. य. देशपांडे, प्रकाशक ब. गो. गर्गे, वीणाप्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. पृष्ठें २८३, किंमत २॥ रु.

जेमतेम अेका गोष्टीला पुरेल इतकीच सामग्री या कादंबरींत आहे, परंतु मनोविश्लेषण या भारदस्त नांवाखालीं बोजड आणि बनावट शब्दांनी भरलेलें २८३ पानांचें अवडंबर लेखकानें रचलें आहे. कादंबऱ्या लिहिण्याचा नाद श्री. देशपांड्यांनी आतां सोडून द्यावा. **शकुंतला परांजपे.**

६. **प्रतिबिंब.** लेखिका, सौ. आनंदीबाअी किर्लोस्कर. प्रकाशक किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी. पृष्ठें १५९ किं. १। रु.

या संग्रहांतील पहिल्या तीन गोष्टी फार चांगल्या आहेत, त्यामुळे पुढील गोष्टींसंबंधी वाचकांची अपेक्षा वाढते आणि त्या वाचल्याने त्यांची थोडीफार निराशा होते. सामान्य जीवनांतील किरकोळ प्रसंग वर्णन करण्याची हातोटी लेखिकेला साधली आहे. वेगवेगळ्या परिस्थितींतील, विशेषतः करुण परिस्थितींतील, स्त्रीहृदय त्या ओळखतात. ‘ वंचिता ’ या गोष्टींतील बालविधवेच्या अंतःकरणाचे पडसाद फार मर्मभेदी आहेत. ‘ निळी ओढणी ’ या कथेंत अेका सामान्य प्रसंगामुळे दोन दोन पण निष्पाप जीवांच्या उत्साहाचा कसा विरस होतो, हें फार हृदयस्पर्शी तऱ्हेने दाखविलें आहे. ‘ प्रेमाची ओढ ’ या गोष्टींत मात्र विनोद अथवा कथानक कांहीच साधलें नाही. आणि ‘ मावशी ’ या गोष्टीला कथानकच नाही. ‘ समदुःखी ’ या गोष्टीची कल्पना चांगली आहे, परंतु सुलोचनेसारखी थोर स्त्री ‘माझ्या या मानसन्मानाचा हेवा वाटतो तुला ’ असें आपल्या मैत्रिणीला म्हणेल हें संभवत नाही. ‘ गुदमरलेलें संगीत ’ या कथेला उठाव देण्याकरतां बिचाऱ्या आक्कासाहेबांना फारच चढेल दाखवावें

लागलें आहे. जातां जातां लेखिकेला अेवढेंच सांगावेंसें वाटतें की केवळ दारिद्य हा सद्‌गुण नव्हे, किंवा श्रीमंती हा दुर्गुण नव्हे. **शकुंतला परांजपे.**

**७. प्रकाशांतील व्यक्ति.** लेखक प्रभाकर पाध्ये. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६।१८ सदाशिव, टिळक रोड, पुणें २. पृष्ठें १२८, किं. १॥ रु.

देशी, विदेशी अशा दहाबारा प्रसिद्ध व्यक्तींचीं दर्शनें या पुस्तकांत घडवलीं आहेत. तीं जरीं उद्‌बोधक आणि मनोरंजक असलीं तरीं अेकांगी आहेत. अेखादी व्यक्ति आवडली म्हणजे आपण तिचें मनसोक्त गुणवर्णन करतों अशी कबुली लेखकाने दिलीच आहे. मात्र आपणास तिचे दोषही दिसतात अशी पुस्ती त्यांनी जोडली आहे. माझी त्यावर अेवढीच टीका आहे की लेखकाला प्रिय व्यक्तीचे दोष जरी दिसले तरी बऱ्याचशा दोषांचा ते उल्लेखच करीत नाहींत, आणि ज्यांचा करतात त्यांवरहि ते जाडजूड पांघरूण घालूं पाहतात. उदा० वामनराव जोशांसंबंधी लिहितांना, 'आत्मचरित्र लिहायचें म्हणजे, त्यांत व्यक्तींवर टीका करावी लागते, आणि तेवढें धैर्य मला नाहीं,' ह्या वामनरावांच्या तोंडच्या प्रामाणिक उद्गारांवर मल्लीनाथी करून ह्या भित्रेपणाला लेखकाने सात्विक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच फडक्यांच्या सार्वजनिक जीवनांतील चंचलपणाबद्दल त्यांनी समाजाला जबाबदार धरलें आहे. अेखाद्या माणसावर वक्रदृष्टि झाली की लेखक त्याचे फाजील वाभाडे काढतो. उदाहरणार्थ केळकरांवर त्याने तरवार धरली आहे. अण्यांवर मात्र त्यांची मर्जी आहे, आणि तेच टिळकांचे खरे शिष्य आहेत असा आग्रह ते धरतात, आणि केळकरांचें शिष्यत्व अमान्य करतात. उदा० 'टिळकांचा निःशस्त्र प्रतिकाराचा कार्यक्रम शास्त्रशुद्ध स्वरूपांत केळकरांनी धडाडीने पुढें ठेवला असता, तर गांधींच्या अव्यवहार्य, अस्थिर व अतिरेकी तत्वांचा जनतेने अंगीकार केला नसता' (पृ. ५८). केळकरांवरचा हा आरोप जरी मान्य केला, तरी लेखकाच्या मर्जींतील अण्यांनी टिळकांचा हा कार्यक्रम धडाडीने पुढें न ठेवतां उलट गांधींच्याच तत्वांना ते कांही कालपर्यंत तरी कां बळी पडले? ह्याचें उत्तर लेखकाने समाधानकारकपणें दिलें पाहिजे.

## ग्रंथपरीक्षण

प्रस्तावना लेखक श्री. वि. ह. कुळकर्णी यांना पाध्यांची भाषा खडबडीत वाटते. मला तसें मुळीच वाटत नाही. ' यशस्विता ' ' तेजस्विता ' अित्यादि चारदोन बनावट शब्द सोडले तर भाषा चांगली आहे आणि माहिती देण्याची लेखकाची पद्धतही नामी आहे. ' ऐतिहासिक दृष्टीने छाननी करून तदनुषंगिक विचारपरंपरेची संगति लावणें हें श्री. पाध्यांच्या लिखाणाचें अेक अनन्यसाधारण वैशिष्टय आहे,' असें श्री. कुळकर्णी म्हणतात. आतां पाध्यांची अैतिहासिक माहिती कधी कधी विपर्यस्त असण्याचा संभव आहे, असें अेका उदाहरणावरून मला म्हणावेंसें वाटतें. आंबेडकरांसंबंधी लिहितांना, 'बॅरिस्टर होऊन परत आल्यावर त्यांनी सिडनहॅम कॉलेजच्या प्रिन्सिपलशिपकरतां अर्ज केला, पण येथेहि त्यांची जात आडवी आली. डॉ. र. पु. परांजप्यांसारख्या बुद्धिवादी शिक्षणमंत्र्यालाही त्यांची नेमणूक करतां आली नाही.' आतां वस्तुस्थिति अशी आहे की त्या कॉलेजचा गोरा प्रिन्सिपल अेकाअेकीं वारल्यावर कोणीही बाहेरील अिसम त्या जागीं नेमायचा नाही असें ठरवलें गेलें, आणि त्या कॉलेजांतीलच सर्वांत जुना प्राध्यापक त्या जागीं नेमला. त्यायोगें त्या लठ्ठ पगाराची बचत झाली. हा नवा अिसम हिंदी माणूस होता आणि या हिंदी माणसाला प्रिन्सिपलच्या जागीं नेमण्यासाठी परांजप्यांना पुष्कळ प्रयास पडले, कारण त्यापूर्वी मुंबअी इलाख्यांत कोणत्याही सरकारी कॉलेजांत हिंदी माणसाला प्रिन्सिपलची जागा कधीहि मिळाली नव्हती. आतां आंबेडकरांविषयी परांजप्यांना काय वाटत होतें हें त्यानंतर सुमारें अेका वर्षाने घडलेल्या हकीकतीवरून कळेल. अेल्फिन्स्टन कॉलेजांतील अितिहास व अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाची जागा रिकामी झाली, तेव्हां आंबेडकरांना ही जागा मिळावी असें परांजप्यांना वाटत होतें, आणि त्यांनी कोणाकडून तरी आंबेडकरांना या जागेसाठी अर्ज करण्यास सांगितलें. परंतु आंबेडकरांच्या अटी विलक्षण होत्या. पहिली अट अशी की आपण अितिहास आणि अर्थशास्त्राचे प्रोफेसर झालों तरी अितिहास शिकवणार नाही, आणि दुसरी अशी की सरकारी नोकरी पतकरली तरी राजकारणांत पडल्या-खेरीज राहणार नाही. यांपैकी कोणतीही अट परांजप्यांनाच काय पण कोणत्याहि शिक्षणमंत्र्याला मान्य होणें शक्य नव्हतें.

**शकुंतला परांजपे.**

# पत्रव्यवहार

१

१. अन्नरस मनुष्याला जन्मापासूनच मिळत असतो, परंतु वीर्योत्पत्ति वयाचे १४ चे पुढें म्हणजे साधारण लैंगिक माहिती व कामेच्छा झाल्यावरच होत असावी. उदा० शहरांतील अविवाहित, ध्येयविहीन सामान्य तरुण व ध्येयनिष्ठ तरुण व खेड्यांतील तरुण यांत फरक दिसतो. शहरांतील सामान्य तरुणांना समाजांतील स्त्रीपुरुषांची संमिश्र रचना व व्यवहार, नाटक, कादंबऱ्या व सिनेमा, यांमुळे लैंगिक माहिती व त्या योगाने कामेच्छा लवकर उत्पन्न होण्याचा संभव असून त्याचें प्रत्यंतर अनेक तरुणांची स्वप्नावस्थेची तक्रार असते यावरून उघड होतें. उलटपक्षीं शहरांतील ध्येयनिष्ठ तरुणांना कामुक गोष्टींकडे लक्ष देण्यास फुरसद नसते, तर खेड्यांतील तरुणांना शहरांतील दृश्यें पाहण्यासच मिळत नाहीत. यामुळे त्यांना वैवाहिक जीवन सुरू होअीपर्यंत वीर्योत्पत्तीची जाणीव किंवा त्रास होत नाही. २. अेक विवाहित गृहस्थ आजारी झाले व त्यांस ४-४॥ वर्षे डाक्टरचे सल्ल्यावरून अन्न वर्ज्य होऊन पेय पदार्थांवर काल काढावा लागला. या अवधींत या दांपत्यास तीन अपत्यें झालीं. दुसरे अेक गृहस्थ संभोगाचे दृष्टीने पूर्ण कार्यक्षम नसल्याने त्यांचे पत्नीस संभोग नकोसा वाटे, तर यांना संभोगेच्छा फार होअी व संभोग नसल्यास स्वप्नावस्था होअी, म्हणजे वीर्य तयार असे. तिसऱ्या अेका गृहस्थांना कामेच्छा फार असे, परंतु त्यांना कांही काल पत्नीशीं संभोग वर्ज्य करणें भाग पडलें व त्या मुदतींत आपलें पुरुषत्वच नष्ट झाल्याचा त्यांना भास झाल्याचें त्यांनी सांगितलें, परंतु नंतर पुनः पूर्वीप्रमाणे कार्यक्रम सुरू झाला. यांपैकी पहिल्या गृहस्थांचें वय २५ ते ३०, दुसऱ्याचें ३० ते ४०, आणि तिसऱ्याची पन्नाशी गांठत आली आहे, तरी संभोगेच्छेंत हे गृहस्थ पहिला नंबर मारतील. यावर अेकच आक्षेप शक्य आहे की या सर्वांचे आहार उच्च दर्जाचे असतील. परंतु आमचे पाहण्यांत अेक उदाहरण असें आहे

की ते गृहस्थ पाप्याचे पितर असून त्यांचा आहारही कदान्नाचा–ज्वारीची भाकर मुख्य अन्न–असूनहि त्यांचें प्रजोत्पादन चांगल्या सुदृढ माणसाप्रमाणे आहे. तरी वरील अनुमान कामशास्त्रदृष्ट्या कितपत सत्य धरण्यांत येअील ? आपला,

**पंढरपूरकर.**

उ. आपलें अनुमान शास्त्रसंमत नाही. केवळ वीर्योत्पत्तिच नव्हे तर शरीराची सर्वच वाढ अन्नरसापासून होत असते, परंतु विशिष्ट भागांची वाढ विशिष्ट वयांतच होते, त्यापूर्वी होत नाही. उदाहरणार्थ डोक्यावरचे केंस प्रथमपासूनच असतात आणि वाढूंहि लागतात, परंतु जननेंद्रियावर किंवा काखेंत केंस विशिष्ट वयापर्यंत येत नाहीत. पुरुषांच्या दाढीमिशा आणि बायकांचे स्तन विशिष्ट वयांतच दिसूं लागतात. ही केसांची व स्तनांची वाढ बीजकोशांवर अवलंबून असते आणि विशिष्ट वयापर्यंत ते हें कार्य करण्यास समर्थ नसतात. कामेच्छाही याच ग्रंथींच्या अंतःस्रावावर अवलंबून असते, नाटकें सिनेमा पाहण्यावर किंवा विवाहित स्थितीवर नव्हे. या गोष्टींनी त्या वाढीला थोडेंबहुत उत्तेजन मिळेल हें खरें, परंतु वाढ त्यावर अवलंबत नाही, आणि ध्येयनिष्ठ तरुणांनी या गोष्टींकडे कितीहि दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांनाही स्वप्नावस्थेचा त्रास होतोच. खेड्यांतील तरुणांना नाटकें सिनेमा पाहण्यास न मिळालीं तरी त्यांचें कामशिक्षण अन्य मार्गानें होत असतें. पशुपक्ष्यांचे प्रत्यक्ष समागम खेडेगांवांतच पहायला मिळण्याचा संभव अधिक असतो, यामुळे स्त्रीपुरुषसंबंधाचें यथार्थ ज्ञान खेडेगांवांतील तरुणांनाच जास्त चांगलें मिळतें. अर्थात् शहरांतील गर्दीमुळे कधी कधी अेका खोलींत दहा माणसांचें कुटुंब रहात असलें, तर तेथे लहान मुलांना प्रत्यक्ष स्त्रीपुरुषांचाच संबंध पाहण्याचा प्रसंग येतो. परंतु अशी ज्यांची स्थिति नाही त्यांची जिज्ञासा अतृप्त राहते. आपण जीं अितर उदाहरणें दिलीं आहेत, त्यांसंबंधी अितकेंच सांगतां येअील की मनुष्याच्या कामप्रकृतीचा अजमास त्याच्या शरीरावरून करतां येत नाही. अत्यंत सुदृढ दिसणारा मनुष्य नपुंसक असूं शकेल आणि पाप्याचे पितर दिसणाऱ्या माणसांना अतोनात संतति होते हें तर नेहमीच दिसतें. उच्च दर्जाच्या अन्नाचाहि यांत संबंध नाही, कारण मुलें गरि-

बांनाच जास्त होतात असें आपण पाहतों. तेव्हा अन्न कसेंहि असलें तरी प्रजोत्पत्तीला तें पुरेसें असतें असें दिसतें. संभोगेच्छेचा आणि प्रजोत्पत्तीचा कांही संबंध नसतो. संभोगाला जवळजवळ असमर्थ असलेल्या पुरुषांना देखील मुलें होतात, कारण त्यांच्या रेतांत जिवंत जंतु असतात आणि ते योनिमार्गाच्या तोंडाशीं पोंचले तरी देखील तेवढ्याने काम होतें. याउलट कित्येक वेळां संभोगेच्छा आणि संभोगशक्ति भरपूर असलेल्या माणसांना मुलें होत नाहीत, कारण त्यांच्या रेतांत जंतुच नसतात. तेव्हा संभोगाच्या अिच्छेचा, शक्तीचा आणि प्रजोत्पत्तीचा जवळजवळ संबंधच नसतो म्हटलें तरी चालेल. पत्नीशीं संभोग अशक्य झाल्याबरोबर आपली कामेच्छा किंवा पुरुषत्वच नष्ट झाल्याचें जे गृहस्थ सांगतात, त्यांवर मात्र विश्वास बसणें कठिण आहे, आणि या बाबतींत लोक सांगतात तें सर्वच खरें नसतें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. **सं.**

२

१. आजकाल शास्त्रीय शोधांतून अखेर निघालेले समज म्हणून बालकाचे अंगीं असणारे रूपगुण हे त्याचे पित्याकडून चार पिढ्या व मातेकडून चार पिढ्या यांतील व्यक्तींतून येतात असें वाचण्यांत येतें. म्हणजे प्रत्येक बालकाचे अंगीं निपजणाऱ्या गुणांत १६ व्यक्तींपैकी कोणाचे ना कोणाचे अधिक गुण येणार असेंच ना ? कीं यांत कांही फरक पडतो ? संभोगाचे वेळीं मातापित्यांचे विचार, गर्भधारणेनंतर प्रथमदर्शन, सावली पडणें, व आशा राहिलेले पितर यांचे रूपगुण उतरतात हें अशास्त्रीय असें ठरलें आहे ना ? २. मे अंकांतील डोंगरे यांचे लेखांत पुढील वाक्यें आहेत—' स्त्रियांच्या रक्तांत जंतुनाशक पदार्थ उत्पन्न झाल्यामुळे त्यांना मूल होत नाही. तेव्हा तो नाहीसा होओपर्यंत त्यांनी संभोग न केल्यास संतति होअील ' यांत विवाहितास पत्नीचे अिच्छेकरतां संभोगसुखास अंतरावें लागण्याने गर्भधारणेकरतां, गर्भधारणेनंतर प्रकृतिस्वास्थ्याकरतां, व प्रसूतीनंतर अवश्य असणारा संभोगत्याग, या रीतीने प्रदीर्घ कालपर्यंत संभोगसुखास अंचवावें लागेल. तसेंच वेश्यांचे बाबतींत संतानेच्छु वेश्येने जीवितसाधनावरच नियंत्रण घातलें पाहिजे ! याशिवाय ' स्परमॅटोटॉक्सिन 'चा कृत्रिम उपायांनी नाश करण्याचा शोध लागला नाही का ? तसा शोध लागल्यास

वेश्यांचे द्रव्योत्पत्तीस व विवाहितांचे संभोगसुखास व्यत्यय न येतां प्रजोत्पादन होईल. ३. मनुष्यस्वभाव सगळीकडे सारखाच असें आपल्या वाचण्यांत व अैकण्यांत येतें. आपल्या राष्ट्रांत जशा अनेक रूढ समजुती आहेत, तशाच पाश्चात्यांतही आहेत. विडी, चिरूट, सिगारेट, हातीं धरण्याच्या पद्धतीवर माणसाचा स्वभाव ठरवणें; तसेंच जोडे, चपला, बूट यांचे झिजेवर स्वभावाचा अजमास करणें, वगैरे समजुती आहेत. तशाच आपल्याकडे लैंगिक व नैतिक क्षेत्रांत पुढील समजुती दिसतात.—( १ ) क्वचित् गाना पतिव्रता, म्हणजे गायन करणारी स्त्री पतिव्रता असणें अगदी अपवादात्मक होय. ( २ ) पायाचे अंगठ्याजवळील बोट अंगठ्यापेक्षां लांब असणारी स्त्री अनेक पुरुषांशीं संभोग घेणारी असते. ( ३ ) चंचल नयन, अस्थिर नजरेची स्त्री पतिव्रता नसते. (४) दिवसांतून अनेक वेळां आरशांत पाहणारी, कासोट्याच्या पट्टीवरून सदैव हात फिरवणारी, सायंकाळीं रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या पुरुषांकडे दरवाज्यांतून किंवा खिडकींतून भेदक किंवा कामुक नजरेने पाहणारी, वगैरे वर्णन जारिणीचें म्हणून जुन्या पुस्तकांतून आढळतें. तसेंच आरशांत पाहणारी विधवा. ( ५ ) पुरुषाप्रमाणे चालणारी, भसाड्या आवाजाची स्त्री, किंवा स्त्रियांप्रमाणे बायकी आवाजाचा पुरुष, हीं जननाला सामान्यतः नालायक असतात, परंतु कामुक हावभाव नि वृथा बडबड यांत प्रवीण असतात. ( ६ ) नपुंसक भसाड्या आवाजाचे, दुष्ट स्वभावाचे असतात. ( ७ ) स्त्री–पुरुषांपैकी ज्यांचे फक्त खालचे ओठ जाड व पुढें आलेले असतात, ते सामान्य संभोगाने तृप्त न होणारे असतात. ( ८ ) अंगावर सुर्मा उर्फ शिबें असणाऱ्या पुरुषाची कामेच्छा व कामशक्ति प्रबल असतात. सदर समजूत पाश्चात्य वैद्यक शिकलेल्यांतही आहे.

आपला **पंढरपूरकर**

उ० १. आपला हिशोब थोडा चुकला आहे असें वाटतें. प्रत्येक मुलाच्या मागच्या पिढींत आई व बाप मिळून दोन व्यक्ति असतात. त्यांचे प्रत्येकाचे आई व बाप घेतल्यास त्याच्या मागच्या पिढींत चार, आणखी मागच्या पिढींत आठ, व आणखी मागच्या पिढींत

सोळा. तेव्हा मागच्या चार पिढ्या घेतल्यास २+४+८+१६ मिळून ३० माणसें होतील, १६ नव्हे. परंतु चारच पिढ्यांतील पूर्वजांचे गुण उतरतात हें शास्त्रीय सत्य नव्हे. मागे जितक्या पिढ्या झाल्या असतील तितक्या हिशेबांत घेतल्या पाहिजेत. आपण दिलेल्या बाकीच्या समजुती खोट्या २. अशी पद्धत अजून निघालेली नाही. ३. यांतल्या बहुतेक समजुती फो ना शेंडा ना बुडखा, अशा आहेत. कांहींच्या मुळाशीं स्त्रियांनीं काय कर आणि काय करूं नये या संबंधीच्या समजुती आहेत, परंतु या समजुती नेह बदलत असतात. स्त्रीने पतीशिवाय कोणत्याहि पुरुषाकडे पाहूं नये अ समजूत असल्यामुळे चंचल नजरेची स्त्री पतिव्रता नसते असें ठरलें. प करतां पोषाखाकडे विशेष लक्ष देण्याचें कारण नाही, तेव्हा वारंवार आरश पाहणारी किंवा कासोटा व्यवस्थित ठेवणारी स्त्री पतिव्रता कशी असणार ? वि वेला तर अगोदरच कोणत्याही पुरुषाकडे पाहण्याची मनाअी, मग खुष कोणा करायचें आणि आरशांत कशाला पहायचें ? इतर समजुतींपैकी अेकही सम खात्रीने खरी आहे असें म्हणतां येणार नाही, आणि बऱ्याच समजुती वेड आहेत. असल्या समजुती सर्वच देशांत असतात हें खरें, आणि त्या शास् नसतात हेंही तितकेंच खरें. सं.

---

# शारदेचें पत्र

अेखाद्यावर टीका करणें किंवा अेखाद्याची निंदा करणें मोठेसें कठिण नस पण स्तुति करणें मात्र बरेंच जास्त कठिण असतें, कारण ती अकलेने केली न तर हास्यास्पद व्हायचा संभव असतो. फाटकांना पत्रकारपरिषदेचे अध केले तेव्हा मुंबअीला त्यांचा जो सत्कार झाला, त्याची हकीकत मीं अैकली मोठी मनोरंजक होती. अर्थात् अशा वेळी स्तुति करणें भागच असतें, पण कशी करावी हें पुष्कळांना कळत नाही. तेव्हा म्हणे वर्दे अध्यक्ष होते, आणि त सुरवातीलाच सांगून टाकलें की फाटक सर्वज्ञ आहेत, अमुक अेक विषय त माहीत नाही असें नाही. कोणालाहि कोणत्याहि विषयांत कांही अडचण अ

ी फाटकांना जाऊन विचारावें ! अर्थात् फाटकांना थोडीशी अक्कल असल्यामुळे यांनी आपल्या भाषणांत सांगितलें की कोणीहि मनुष्य सर्वज्ञ नसतो आणि मीहि ाही. याच सभेंत 'धनुर्धारी'च्या पाध्यांना बोलायला सांगितलें होतें. ते ्हणाले, 'कांही पुस्तकें फक्त मीच वाचतों अशी माझी कल्पना होती, पण ेकदां फाटकांशी बोलतांना मला आढळलें की त्यांनीहि तीं पुस्तकें वाचलीं ोतीं.' थोडीबहुत घमेंड सगळ्यांनाच असते, पण पाध्यांची कांही और आहे. ेकाच मनुष्याकरतां पुस्तकें प्रसिद्ध करायला परवडतील ही कल्पनाच मला ाली नसती. पण फाटक भेटेपर्यंत पाध्यांची तशी कल्पना होती असें दिसतें. सो, पण तसल्या पुस्तकांना निदान दोन तरी वाचक असतात, हें आतां तरी ाध्यांना कळलें हें बरें झालें.

या फाटकांनी पुण्याला जे तारे तोडले त्यांनी मी तरी थक्क झालें. म्हणाले, 'पत्रकारांकडून निर्भेळ सत्याची अपेक्षाच वाचकांनी कां करावी ?' ्हणजे पत्रकारांनी खुशाल वाटेल त्या थापा माराव्या असें मत त्यांनी दिलें. ाजकारणांत बहुतेक लोक थापा मारतात हें मला माहीत आहे, पण तसें ्यासपीठावरून कोणी उघडपणें सांगेल असें मला वाटलें नसतें. अितकें स्पष्ट ाल्यावर सुद्धां फडके म्हणतात की फाटकांचें मत माझ्यासारखेंच आहे. ाटक असेंहि म्हणाले की वैयक्तिक टीका खुशाल करावी, म्हणजे वैयक्तिक ीका करावी अितकेंच नव्हे, तर ती खोटी असली तरीहि चालेल असें ाटकांचें मत आहे, आणि फडक्यांना तें पसंत आहे. तेव्हा फडक्यांना ारोखरच कांही मत आहे की काय याबद्दल शंका येते. अश्लील मराठ्यांचीं ते फडक्यांना पसंत आहेत, फाटकांचीं मतेंही त्यांना पसंत आहेत. पण ाटकांना मात्र मराठ्यांचीं मतें मुळीच पसंत नाहीत. फडके सोयीप्रमाणें ापलीं मतें बदलीत असतात आणि सोयीला येतील तीं मतें आवेशाने मांडीत सतात असें यावरून दिसतें. अशा मतांना काय किंमत आहे. ?

स्तुतीचा आणखी अेक मासला म्हणजे अलीकडे रेडिओमधल्या मर्ढेकरांची ी सर्वत्र स्तुति होत असते ती. ज्याचें नांवही कधी कोणी अैकलें नव्हतें, असा

मनुष्य अेकाअेकी उत्तम मराठी लेखक आणि उत्कृष्ट मराठी टीकाकार ठरतो कसा, याचा उलगडा मला बरेच दिवस झाला नव्हता. वरेरकरांनी पूर्णिमेंत स्पष्ट विचारलें होतें की ' हे मर्ढेकर कोण ? ' ते येथल्या रेडिओ स्टेशनचे अेक अधिकारी आहेत हें कळल्यावर या भरमसाट स्तुतीचा उलगडा झाला. अेखादा नवा गव्हर्नर आला म्हणजे त्याच्या अंगांत असलेले आणि नसलेलेही गुण जसे ' टाअिम्स ऑफ इंडिआ ' सारख्या पत्रांना दिसूं लागतात, तशीच मर्ढेकरांची स्थिति झालेली आहे. लहानपणीं वाचलेल्या ' यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः ' या श्लोकाची मला आठवण होते. मर्ढेकरांच्याजवळ पैसा किती आहे हें मला माहीत नाही, पण अधिकाराचें महत्त्व पैशापेक्षाही जास्त आहे, आणि त्यांचा अधिकार असा आहे कीं ते दुसऱ्याला दोन पैसे मिळवून देऊं शकतात. मग स्तुतीला काय तोटा ? ' अहो ते मराठी टीकाकार कसे ? ' तर ' त्यांचें इंग्रजीचें ज्ञान देखील अगाध आहे; आणि लंडन टाअिम्समधें देखील त्यांची स्तुति आलेली आहे. ' मीं असें अैकलें होतें की ते आय्. सी. अेस्. नापास झालेले आहेत, आणि आय्. सी. अेस्. च्या परीक्षेंत कोणालाहि नापास होतां येतें, अर्थात् विलायतला जाण्याअितके पैसे मात्र पाहिजेत. टाअिम्सने स्तुति केली असली तर त्यांना अिंग्रजी येत असेल असें म्हणायला जागा आहे. मराठी ते कसें लिहितात हें मला माहीत नाही. पण त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा जो अेकदम वर्षाव झाला, त्यांतलें अिंगित मला आतां समजलें. या स्तुतिपाठकांचीं नांवें वारंवार रेडिओच्या कार्यक्रमांत असतात आणि प्रत्यक्ष कार्यक्रम नसले तरी अितर रीतींनीही रेडिओकडून त्यांना प्राप्ति असते, तेव्हा या पगारी स्तुतिपाठकांच्या मतांना मोठीशी किंमत मात्र कोणी देणार नाही.

प्रो. गो. के. भट ' समीक्षक ' मधें ' आजच्या वाङ्मयांतील प्रेमाचें दर्शन ' या मथळयाखाली जी लेखमाला लिहीत आहेत, तीवरून त्यांचें म्हणणें अितरांना कळायचें बाजूलाच राहो, पण तें त्यांचें त्यांना तरी कळलें आहे की काय याची शंका येते. या विषयावर येथे जी चर्चा झाली होती तिचा उपन्यास त्यांनीच केला होता, आणि त्या वेळींही त्यांनी

असाच घोटाळा केला होता. अितर भाषांतील अनेक उदाहरणें देऊन त्यांनी तीं उत्कृष्ट आहेत असें सांगितलें आणि मराठी वाङ्मयांत तशीं नाहीत असें त्यांचें म्हणणें दिसलें. जीं उदाहरणें उत्तम म्हणून त्यांनी सांगितलीं त्यांत ' लैंगिक भावना ' कलात्मक रीतीने मांडलेल्या आहेत आणि त्या तशा मांडल्या तरच त्या क्षम्य आहेत, अेरवीं त्या मांडतां नयेत, असा त्यांच्या म्हणण्याचा अेकंदर निष्कर्ष दिसला. पण याचा अर्थ काय ? हाच नियम कोणत्याहि भावनांना लावतां येअील, मग तो ' लैंगिक ' भावनांबद्दलच विशेष जोराने सांगण्याचें कारण काय ? लेखक जर खरा कलावंत असेल, तर तो कोणत्याहि भावना कलात्मक रीतीनेच मांडील. त्या तशा मांडाव्या हें प्रो. भटांनी सांगण्याची तो वाट पाहणार नाही. मराठी ललितकृतींत अितर भावना कलात्मक रीतीने मांडलेल्या असतात आणि लैंगिक भावना मात्र कलाहीन रीतीने मांडलेल्या असतात, असें प्रो. भटांना म्हणायचें आहे काय ? असें असेल तर तें हास्यास्पद आहे. ज्या लेखकाला अितर भावना कलात्मक रीतीने मांडतां येतात, त्याला या भावना मात्र तशा मांडतां येत नाहीत, किंवा तो मुद्दाम कलाहीन रीतीने मांडतो, हें शक्य असेल काय ? त्यांच्या म्हणण्याचा कांही अर्थ होत असला तर तो अितकाच की मराठींत कलावंत लेखकच नाहीत आणि अितर भाषांत आहेत. असें त्यांचें मत असणें शक्य आहे, पण याबद्दल मतभेद होअील. अेरवीं त्यांच्या म्हणण्याचा कांही अर्थच होत नाही.

वसंतव्याख्यानमालेंत सहशिक्षणाविरुद्ध दिलेल्या व्याख्यानांत प्रो. नारळकरांनी सांगितलें की ' आत्मविश्वासाचे विचार मनांत न येतां जे विचार २२ व्या वर्षी यावयास पाहिजेत ते १४ व्या वर्षीच येतात. याला कारण सहशिक्षण होय. ' प्रोफेसरमजकुरांना मानवी शरीराच्या वाढीसंबंधी बिलकुल ज्ञान नसावें अितकेंच यावरून दिसतें. कदाचित् ' जे विचार २२ व्या वर्षी यावयास पाहिजेत ' ( म्हणजे २२ व्या वर्षापूर्वी येऊं नयेत ) या शब्दांनी व्याख्यात्यांना आपली स्वतःची अिच्छाच दर्शवायची असेल, परंतु निसर्गाची व्यवस्था दुर्दैवाने प्रो. नारळकरांच्या अिच्छेवर अवलंबून नाही. स्त्रियांना व पुरुषांना बालपणा-

पासून अेकमेकांचे दर्शन होऊं नये अशी खबरदारी घेतली तरीदेखील, २२ व्या वर्षांपर्यंत त्यांच्या मनांत कामवासना उत्पन्न होणार नाही, असें कोणताही शरीरशास्त्रज्ञ म्हणणार नाही. शरीराच्या नैसर्गिक वाढीचें खापर सहशिक्षणावर कसें फोडतां येअील ? प्रो. नारळकर तरी निदान रा. म. आठवल्यांच्यासारखें अज्ञान दाखवणार नाहीत असें मला वाटलें होतें, पण तेंही खोटें ठरलें. स्त्रियांचे बाबतींत फारतर १४ आणि पुरुषांचे बाबतींत १६ वर्षांचे सुमारास कामवासना जागृत होऊं लागते, आणि त्यांत सहशिक्षणाचा बिलकुल संबंध नाही. आतां कोणाला जर असें म्हणायचें असेल कीं शिक्षण पुरें करणें हें कामवासनेपेक्षा अधिक महत्त्वाचें असल्यामुळे या वयांत कामवासनेला वाव देणें अिष्ट नसतें, आणि याकरतां ती जागृत होते त्या सुमारास मुलांमुलींना अेकत्र येऊं देतां नये, तर त्याला कांही अर्थ आहे. पण सहशिक्षणाला विरोध करणारांनी भलतींच कारणें न सांगितलीं तर त्यांच्या मताचा अधिक परिणाम होण्याचा संभव आहे.

मनुष्येतर प्राण्यांत आणि प्राथमिक अवस्थेंतील मानवी गटांत देखील मुलांमुलींचे समागमाचे प्रयत्न खरा समागम शक्य होण्यापूर्वीपासूनच सुरू असतात, आणि त्यांमुळे त्यांचें कांही नुकसान होतें असेंहि दिसत नाही. परंतु तेथे शाळाकालेजांचा किंवा शिक्षणाचा प्रश्न नसतो. आपल्याला शिक्षणांत बरींच वर्षें घालवावीं लागत असल्यामुळे कामविषयक भावना दडपून टाकल्या नाहीत तर त्यांत व्यत्यय येअील, म्हणून शिक्षणांत पडदा असावा असें कांही लोक म्हणतात. परंतु अमेरिकेंत सर्रास सहशिक्षण चालू आहे आणि अमेरिकन लोक शिक्षणांत आपल्यापेक्षा मागसलेले नाहीत. आतां येथे सहशिक्षण केवळ नांवाचें असतें, खरें सहशिक्षण नसतेंच, ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याला उपाय म्हणून सहशिक्षण अजीबात बंद करावें की काय हा प्रश्न निदान विवाद्य आहे. या वेळीं सहशिक्षणाविरुद्ध हाकाटी केल्यास तें कधींहि सुरू होणें शक्य नाही, कारण हीं कारणें नेहमीच राहणार. अर्थात् सहशिक्षण कांही झालें तरी अनिष्टच आहे असें ज्यांना वाटत असेल त्यांनी हाकाटी करावी, परंतु मला तरी तसें वाटत नाही.

तुझी **शारदा**

---